## संक्षिप्त

### आंदोलनाप्रकरणी पाच जणांवर गुन्हा दाखल

**सोलापूर :** दूध दरवाढीबाबत आंदोलनाची कोणतीही पूर्वपरवानगी न घेता, जमाव बंदी आदेशाचे उल्लंघन करून सहकारमंत्री सुभाष देशमुख यांच्या घरासमोर आंदोलन केल्याप्रकरणी पाच जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. डॉ. शिवानंद सिद्राम झळके (वय २७, रा. मंद्रुप, ता. दक्षिण सोलापूर), चाँद हुसेन कोरबू (वय ४०, रा. बसवनगर, तेरामैल, सोलापूर), राजकुमार काशिनाथ टेळे (वय २६, रा. मंद्रुप, ता. दक्षिण सोलापूर), महंमद शब्बीर शेख (वय २६, रा. मंद्रुप), संतोष बाबूराव साठे (रा. दक्षिण सोलापूर) अशी त्यांची नावे आहेत. हे आंदोलन १६ जुलैला दुपारच्या सुमारास होटगी रोडवरील सहकारमंत्री देशमुख यांच्या घरासमोर करण्यात आले होते. त्याप्रकरणी हे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

# संतश्रेष्ठ तुकोबाराय पालखीचे सोलापूर जिल्ह्यात आगमन

## अकलूजच्या सोहळ्यातील भव्य गोल रिंगणाने दिपले डोळे

**सोलापूर (प्रतिनिधी) :**
**पिटू भक्तिचा डांगोरा । कळिकाळासी दरारा ।**
**तुका म्हणे करा । जयजयकार आनंदे ।**

असा भाव मनी धरून भक्तिचा डांगोरा पिठत, टाळ-मृदंगाचा गजर आणि 'ज्ञानोबा-तुकाराम'' अशा जयघोषात बुधवारी (ता.१८) सकाळी पादुकांचे नीरास्नान उरकून संतश्रेष्ठ तुकाराम महाराज पालखी सोहळ्याने जिल्ह्यातील अकलूज शहरात प्रवेश केला. त्यानंतर सदाशिवराव माने विद्यालयाच्या प्रांगणावर भव्य असे तिसरे गोल रिंगण रंगले. अश्वांची नेत्रदीपक घोडदौड आणि तुळस वृंदावन डोक्यावर घेऊन महिलांनी केलेला धावा, हे दृश्य जणू डोळे दीपणारे ठरले.

पुणे जिल्ह्यातील शेवटचे गाव असलेल्या सराटी (ता. इंदापूर) येथील नीरा नदीच्या तीरावर पालखी सोहळ्याचा मंगळवारी मुक्काम झाला. पंढरी समीप आल्याने भल्या पहाटेच जिल्ह्यातील आगमनासाठी वारकऱ्यांमध्ये उत्साह दिसत होता. पहाटे तीन वाजल्यापासूनच भाविकांनी नीरा नदीच्या वाळवंटात स्नानासाठी गर्दी केली होती. सकाळी साडेसहाच्या सुमारास पालखीतील पादुका नीरा नदीपात्रात नेण्यात आल्या. पादुकांना नीरा स्नान घालण्यात आले. सकाळी आठ वाजता सराटीतील भाविकांचा निरोप घेऊन सोहळा अकलूजकडे निघाला. नीरा नदीवरील पूल ओलांडल्यानंतर सोहळ्याने सोलापूर जिल्ह्यात प्रवेश केला. त्या वेळी पालकमंत्री विजयकुमार देशमुख, जिल्हाधिकारी डॉ. राजेंद्र भोसले यांनी सोहळ्याचे स्वागत केले. त्यानंतर अकलूजच्या गांधी चौकातून ठिकठिकाणी जल्लोषी स्वागत स्वीकारत सोहळा पुढे सरकला. भक्तिचा आगळा प्रवाह या रस्त्यावर वाहत होता. ज्ञानोबा-तुकारामच्या भजनाने अवघा आसमंत भारुन गेला होता.



**अकलूज : संतश्रेष्ठ तुकाराम महाराज पालखी सोहळ्यातील रिंगण सोहळ्यात अश्वाच्या मागे डोक्यावर तुळसवृंदावन घेऊन धावा करणाऱ्या महिला वारकरी.**

### भव्य गोल रिंगणाने डोळे दीपले

संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यातील भव्य असे गोल रिंगण सदाशिवराव माने विद्यालयाच्या प्रांगणात झाले. त्यासाठी सकाळपासूनच प्रांगणात गर्दी झाली होती. सोहळा पोचल्यानंतर 'ज्ञानोबा- तुकाराम''चा जयघोष सुरू झाला. झेंडेकरी, टाळकरी, पखवाज वादक, तुळस वृंदावन व कळस घेतलेल्या महिलांच्या स्वतंत्र ओळी लावण्यात आल्या. पखवाज व टाळांनी चांगलाच ताल धरला. सर्व दिंड्या प्रांगणात आल्या. सर्वांच्या नजरा रिंगणावर खिळल्या. 'पुंडलिक वरदे हरी विठ्ठल' जयजयकार झाला आणि तुळस वृंदावन व कळस घेतलेल्या महिलांनी रिंगणात धावून प्रदक्षिणा पूर्ण केली. त्या पाठोपाठ विणेकरी, टाळकरी, पखवाज वादक धावले. मानाच्या अश्वाने प्रदक्षिणा पूर्ण केल्यानंतर स्वाराच्या अश्वाने दोन प्रदक्षिणा घातल्या. हजारो भाविकांनी डोळे दीपवणारा हा सोहळा साठवून ठेवला.

## पंढरपुरातील वीज सुरक्षेसाठी महावितरण सज्ज

**सोलापूर (प्रतिनिधी) :** सोलापूर जिल्ह्यात पालखी सोहळ्यांचे आगमन व पंढरपूरमधील आषाढी एकादशी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर महावितरणकडून वीजयंत्रणेच्या देखभाल व दुरुस्तीचे कामे पूर्ण करून यंत्रणा सज्ज करण्यात आली आहे. सुरळीत वीजपुरवठ्यासह वीजसुरक्षा व अन्य सेवेसाठी सुमारे ५१० अभियंते व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

पालखी सोहळा व आषाढी यात्रेदरम्यान सार्वजनिक ठिकाणी असलेल्या वीजयंत्रणेपासून सतर्क राहावे. कोणत्याही वीजवाहिनीतून वीजचोरी करू नये. महावितरणकडून तात्पुरता वीजपुरवठा देण्यासाठी यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली असून मागणीप्रमाणे वीजजोडणी देण्याची कार्यवाही तात्काळ करण्यात येत आहे, अशी माहिती महावितरणतर्फे देण्यात आली आहे. पालखी यात्रा व मुक्कामाच्या ११ ठिकाणी अतिरिक्त रोहित्र लावण्यात आलेले आहेत. महावितरणच्या सोलापूर मंडल कार्यालय व पंढरपूर विभाग कार्यालयात रात्रंदिवस नियंत्रण कक्ष सुरू राहणार आहे. वीजचोरीमुळे होणारा वीजअपघात टाळण्यासाठी भाविकांनी वीजयंत्रणेपासून सतर्क राहावे, असे आवाहन महावितरणने केले आहे.



**अकलूज, जि. सोलापूर : संतश्रेष्ठ तुकाराम महाराज पालखी सोहळ्यातील भव्य असे गोल रिंगण सदाशिवराव माने विद्यालयाच्या प्रांगणात पार पडले.**

सकाळ अॅग्रोवन
आयोजित
महाधन
नजर ठेवा उद्यावर
प्रायोजित
अॅग्रोवन संवाद
**'अॅग्रोवन' साधणार शेतकऱ्यांशी संवाद**
कार्यक्रम वेळापत्रक
**शुक्रवार, २० जुलै २०१८**
**विषय - ऊस उत्पादन वाढीचे तंत्रज्ञान**
**वक्ते - डॉ. बी. एस. कदम**
(मृदा शास्त्रज्ञ, के.व्ही. के. सोलापूर)
**स्थळ - हनुमान मंदिर, बरूर, ता. द. सोलापूर, जि. सोलापूर**
**वेळ - सकाळी ६ वा.**
या मार्गदर्शन मेळाव्याचा आपण व आपल्या शेतकरी मित्रांनी अवश्य लाभ घ्यावा, ही विनंती.

# कर्नाटकातून येणारे दूध आंदोलकांनी अडवले

## जिल्ह्यात आंदोलनाला शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद; दुधाचे मोफत वाटप

**सोलापूर (प्रतिनिधी):** दुधाच्या वाढीव दरासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेने पुकारलेल्या राज्यव्यापी दूध बंद आंदोलनाला सोलापूर जिल्ह्यात सगळीकडेच शेतकऱ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. आंदोलनाच्या सलग तिसऱ्या दिवशीही बुधवारी (ता. १८) जिल्ह्यातील सुमारे दोन ते अडीच लाख लिटर संकलन बंदच होते. अनेक ठिकाणी दूध ओतणे, टँकर फोडणे, अडवणे अशा पद्धतीची आंदोलने सुरूच राहिली. दरम्यान, शेतकरी संघटनेच्या काही कार्यकर्त्यांची पोलिसांनी धरपकड केली; पण नंतर समज देऊन सोडून देण्यात आले. पण संघटनांनी हे आंदोलन आणखीनच तीव्र करण्याचे जाहीर करत गुरुवारी (ता. १९) जिल्ह्यात ठिकठिकाणी जनावरांसह रास्ता रोको करण्याचा इशारा दिला आहे.

गेल्या दोन दिवसांपासून जिल्ह्यातील विविध भागांत स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते चांगलेच आक्रमक झाले आहेत. सोलापूर जिल्ह्यात कर्नाटकच्या सीमा भागातून येणारे दूध मंगळवारी सायंकाळी वडकबाळ गावानजीक कार्यकर्त्यांनी अडवले. त्यानंतर हे दूध गावातील गरीब लोकांना वाटण्यात आले. त्याशिवाय बेगमपूर (ता. मोहोळ) येथे नेचर दूध डेअरीच्या प्लान्टमध्ये शेतकऱ्यांनी थेट घुसून डेअरीमधील टाक्यांमध्ये असलेले जवळपास २० हजार लिटर दूध सांडून टाकले.



**सोलापूर : 'स्वाभिमानी 'च्या कार्यकर्त्यांनी दूध डेअरी मधील दूध असे सोडून दिले.**

पंढरपुरातही दूधपुरवठा करण्यासाठी आणण्यात येत असलेला एक टँकर कार्यकर्त्यांनी शहरात पकडून फोडला. त्यातील दूध पंढरपुरातील वारकऱ्यांना वाटण्यात आले. त्याशिवाय तालुक्यातील तुंगत येथे मध्यरात्री शिवामृत दूध संघाचे सोलापूरकडे निघालेले पाच टँकर अडवले. यामध्ये तीन टँकरमध्ये दूध आणि दोन गाड्यांमध्ये दूध पिशव्या आंदोलकांनी माघारी पाठविले. जिल्हाध्यक्ष समाधान फाटे, जिल्हा संघटक विजय रणदिवे, तालुकाध्यक्ष तानाजी बागल, आदींनी आंदोलनात भाग घेतला. माळशिरस आणि माढा तालुक्यातही काही भागांत कार्यकर्त्यांनी दूध टँकर फोडले. दरम्यान, आंदोलनाची ही धार वाढतच असल्याने सोलापूर जिल्हा दूध संघासह खासगी दूध व्यवसायिकांनी तिसऱ्या दिवशीही संकलन बंद ठेवले.